चोरी गेलेल्या दोन मोटारसायकलीसह आरोपी अटकेत

रावेर । प्रतिनिधी

रावेर पोलीस स्टेशनच्या गुन्हे शोध पथकाने चोरीला गेलेल्या दोन मोटारसायकलींसह एकाला अटक करत मोठे यश मिळवले आहे. आरोपीकडून चोरीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून, पोलीस तपासात आणखी गुन्ह्यांची उघड होण्याची शक्यता आहे.

दि.५ जून रोजी शेख अकील शेख कलीम (रा.नागझिरी मोहल्ला, रावेर) यांच्या हिरो होंडा कंपनीची सुपर स्प्लेंडर मोटारसायकल (क्र.एमएच १९ सीएस ०३९२) ही रसलपूर रोडवरील हॉटेल ड२ समोरून अज्ञात व्यक्तीने चोरून नेल्याची तक्रार त्यांनी रावेर पोलीस स्टेशनला दिली होती. या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपासादरम्यान मिळालेल्या माहितीनुसार आणि सीसीटीव्ही फुटेजच्या विश्लेषणानंतर संशयित आरोपी सुशिल सुधाकर तायडे (वय ४४, रा. रसलपूर, ता.रावेर) यास अटक करण्यात आली. त्याच्याकडे सखोल चौकशी केली असता त्याने दोन मोटारसायकल चोरी केल्याची कबुली दिली.पोलीसांनी त्याच्या ताब्यातून हिरो होंडा सुपर स्प्लेंडर (लाल रंग, क्र.एमएच १९ सीएस ०३९२,हिरो होंडा स्प्लेंडर प्लस (काळा रंग, क्र. एमपी ६८ एमई ५९५४) जप्त केल्या आहे.सदरील कारवाई पो.नि.डॉ. विशाल जयस्वाल यांच्या मार्गदर्शनाखाली पोहेकॉ.सिकंदर तडवी, पोना. कल्पेश आमोदकर, पोकॉ. सचिन घुगे, विशाल पाटील, प्रमोद पाटील, महेश मोगरे, श्रीकांत चव्हाण, सुकेश तडवी, विकारुद्दीन शेख यांच्या पथकाने केली. पुढील तपास पोहेकॉ. सिकंदर तडवी करीत आहेत. आरोपीला रावेर न्यायालयात हजर केले असता न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे.

पूर्णपात्रे विद्यालयात पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे जंगी स्वागत

चाळीसगाव । प्रतिनिधी

शहरातील डॉ.सौ.प्रमिलाताई पूर्णपात्रे विद्यालय चाळीसगाव येथे सोमवार दि.१६ रोजी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चा प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सेल्फी विथ वेलकम पॉईंट येथे मान्यवरांनी नवगत विद्यार्थ्यांसोबत फोटो घेतले व विद्यार्थ्यांना नवीन पाठ्यपुस्तके व लाडू देऊन स्वागत केले.

विद्यार्थ्यांच्या प्रवेशोत्सव व नवगतांच्या स्वागतासाठी संपूर्ण शाळा सुंदररीत्या सजविण्यात आली होती. यात वेलकम सेल्फी पॉईंट,सुंदर आंब्यांचे तोरण, डोक्यात घालण्यासाठी मुकुट, अक्षर गिरविण्यासाठी तांदळाच्या राशी, प्रवेशावेळी पायांचे रंगाचे ठसे पांढऱ्या कापडावर उमटविणे, अक्षराचा श्रीगणेशा, पाठयपुस्के वाटप, गोड पदार्थ वाटप, शिक्षकांनी बसविलेले ढोलपथक व संगीतमय वातावरणात विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले.

अध्यक्षस्थानी संस्थेच्या सचिव डॉ.सौ. शुभांगीताई पूर्णपात्रे ह्या होत्या, तर मुख्याध्यापक रमेश सोनवणे, ज्येष्ठ शिक्षक आनंद जगताप आदी उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांचे औक्षण करून पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. याप्रसंगी डॉ.सौ. शुभांगीताई पूर्णपात्रे यांनी विद्यार्थी-शाळा व पालक-शाळा यांच्या नात्याबाबत असलेल्या महत्त्वाबाबत सांगितले तसेच पहिल्या दिवशी शाळेने राबविलेल्या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना मजा आली का? असे विचारले असता, सर्व विद्यार्थांनी होकार दिला व अशीच मजा, आनंद शाळेत मिळत असतो असे यावेळी सांगितले, प्रत्येक पालकांनी जागृत राहून विदयार्थी हितासाठी शाळा राबवित असलेल्या उपक्रम व स्पर्धा परीक्षेत भाग घेण्यासाठी मुलांना प्रवृत्त केले पाहिजे असे त्यांनी सांगितले. यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक बंधू-भगिनी व शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले. सूत्रसंचालन योगेश साळुंखे यांनी केले. आभार मुख्याध्यापक रमेश सोनवणे यांनी मानले.

कुपोषित बालकांसाठी सरपंच दिपक पाटील यांनी केली अतिरिक्त आहाराची व्यवस्था

साकळी, ता.यावल । वार्ताहर

येथीलडॉ.बाबासाहेब आंबेडकर नगरातील 'संस्कार' अंगणवाडी शाळेच्या कार्यक्षेत्रात कुपोषित बालकापैकी सॅम श्रेणीतील २ बालके, मॅम श्रेणीतील ६ बालके, SUW श्रेणीतील २ बालके व २ बालके आजारी अशी १२ बालके अंगणवाडी शिक्षिका मंगला नेवे यांच्या लक्षात आली होती. या लहान मुलांना या आजारातून बरे करण्यासाठी सौ.नेवे मॅडम यांनी गेल्या मे आणि जून या दोन महिन्यात १०८ नंबर ला कॉल करुन या सर्व मुलांना जळगाव ला सिव्हीलला नेले.

त्यांच्यावर तेथे योग्य असे उपचार करण्यात आले. आता त्यांची तब्येत चांगली आहेत.दरम्यान ही सर्व मुले अतिशय गरीब घरातील व मोलमजुरी करणाऱ्या पालकांची असल्याने त्यांना योग्य अशा आहाराची गरज होती व त्या आजारातून त्यांना बरे करणे गरजेचे होते. यासंबंधी सौ.नेवे यांनी ग्रामपंचायत कार्यालयाशी संपर्क साधून सरपंच दिपक पाटील यांना माहीती दिली.

या कुपोषित व विविध श्रेणीतील बालकांना अतिरिक्त सकस आहार द्यावा लागेल यासाठी ग्रामपंचायतीच्या माध्यमातून व्यवस्था करून द्या अशी मागणी संबंधित कर्मचाऱ्यांनी सरपंच दिपक पाटील यांच्याकडे केली. सरपंच दिपक पाटील यांनी मुलांच्या अतिरिक्त सकस आहारासाठी योग्य ती तरतूद करून या बालकांसाठी अतिरिक्त आहारात रोज प्रत्येकी एक अंडे, गुळ, शेंगदाणे, खजुर आणि पोषण आहारात खोबरेल तेल असा तब्बल एक महिना पुरेल अशा आहाराची व्यवस्था करून दिली. सरपंच दिपक पाटील यांच्या लहान बालकांच्या आरोग्य हितासाठी घेतलेल्या निर्णयाचे कौतुक होत आहे.

यंग नेटवर्क फाउंडेशनतर्फे आरोग्य सत्र

यावल । प्रतिनिधी

यंग नेटवर्क फाउंडेशनच्या पुढाकाराने यावल तालुक्यातील चुंचाळे ग्रुप ग्रामपंचायती अंतर्गत येणाऱ्या गायरान या आदिवासी वस्तीवर आरोग्य सत्राचे आयोजन करण्यात आले. संस्थेचे शिक्षण, आरोग्य, रोजगार, महिला सक्षमीकरण, नागरिकत्वाचे पुरावे व योजनांचा लाभ मिळवून देणे या विविध क्षेत्रात वस्ती पातळीवर सक्रियपणे कार्य करत आहेत.

या सत्रासाठी तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय, यावल येथील नरेंद्र भिकनराव तायडे (STLS) यांनी उपस्थित राहून नागरिकांना सविस्तर आरोग्य विषयक मार्गदर्शन केले. त्यांनी क्षयरोग (TB) आणि कुष्ठरोग (Leprosy) यांची लक्षणे व उपचार पद्धती सांगितली. तसेच सिकलसेल या अनुवांशिक आजाराबाबत माहिती देत, त्याची तपासणी व उपचार पद्धतीही समजावून सांगितली.

त्यांनी पोलिओ व लसीकरणाचे महत्व विषद करत, नियमित लसीकरणाने होणाऱ्या आजारांपासून बचाव कसा होतो हे समजावले. यासोबतच त्यांनी सरकारी रुग्णालयात प्रसूती का करावी यावर भर देत, महिलांच्या व बालकांच्या आरोग्यासाठी ते किती आवश्यक आहे हे उदाहरणासहित स्पष्ट केले. बालविवाह, विशेषतः मुलींच्या लहान वयात होणाऱ्या विवाहामुळे त्यांच्या आरोग्यावर होणाऱ्या परिणामांबद्दलही त्यांनी गंभीरता मांडली. अशा विवाहांमुळे भविष्यात त्या महिलांना गर्भाशयाच्या कॅन्सरसारख्या आजारांना कसे सामोरे जावे लागते, याची जाणीव उपस्थितांना करून दिली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी यंग नेटवर्क फाउंडेशनचे स्वयंसेवक आशा वर्कर आणि स्थानिक ग्रामस्थांचे सहकार्य लाभले.

आ. अमोल हरीभाऊ जावळे अभीष्टचिंतन विशेष!

केळी बेल्टच्या समृद्धी सुबत्तेतला गतीमान करणारे आ. अमोल जावळे

रावेर मतदार संघात लोकप्रतिनिधीचा समृद्ध वारसा आहे. स्व मधुकरराव चौधरी,स्व. डॉ गुणवंतराव सरोदे,स्व.हरिभाऊ जावळे, माजी आमदार राजाराम महाजन,अरुण पांडुरंग पाटील, शिरीष मधुकरराव चौधरी यांनी या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केले आहे.विरोध हा पक्षीय पातळीवर असला तरी विकासाच्या मुद्याला नेहमीच प्राधान्य दिले गेले आहे. त्याच मतदार संघात अमोल जावळे नेतृत्व करत आहे. केळीची समृध्दी आणि माणसातील सोज्वळता असलेल्या मतदार संघात निर्माण झालेल नेतृत्व सहृदयी,संवेदनशील मनाच आहे.

अतिशय मनमिळावू,मदतीसाठी कायम तत्पर आणि समाजकार्यात झोकून दिलेले व्यक्तीमत्व म्हणून त्यांची ओळख निर्माण होत आहे. लोकांमध्ये राहणारा लोकप्रिय आमदार अशी त्यांची वागणूक मतदार संघातील नागरिकांना मिळत आहे.जेव्हा नेपाळ येथे बस अपघात झाला.या दुर्दैवी अपघातात मरण पावलेल्या व जखमी पर्यटकांना मदत करण्यासाठी धावून जाणारा आमदार संपूर्ण महाराष्ट्राने पहिला आहे.मतदार संघात अनेक प्रश्न आहे.ते सोडवण्यासाठी सातत्याने विचार मंथन करत त्यांनी या योजना पूर्ण करण्याचा संकल्प केला आहे.मेगा रिचार्ज योजना हा महाराष्ट्रातील कोरडवाहू भागातील क्षेत्र सिंचनाखाली आणणारा महत्वपूर्ण प्रकल्पाला गती प्राप्त होणार आहे.हे स्वप्न पुर्ती कडे होणारी वाटचाल अनेक पिढ्यांचे कल्याण करणारी आहे.

आमदार अमोल जावळे यांनी कमी कालावधीत अधिक लोकप्रियता मिळवली आहे.सकाळी मतदार संघातील नागरिकांची त्यांच्या निवासस्थानी होणारी गर्दी त्यांच्यातील काम करण्याची उर्मी अनेकांनी अनुभवली आहे. सकारात्मक उर्जा घेवून झालेली सुरवात शेतकऱ्यांचे,कष्टकर्यांचे,विद्यार्थी यांचे प्रश्न सोडवण्यासाठी असते.विविध समस्या घेवून येणाऱ्या नागरिकांचे समाधान करतांना आपुलकी आणि प्रेम कोणताच कार्यकर्ता विसरू शकत नाही.रावेर मतदार संघात आमदार अमोल जावळे यांच्यावर प्रेम करणारे लाखो कार्यकर्ते असून,अफाट लोकप्रियेतेचे ते धनी आहे.

अभीष्टचिंतन

चंद्रकांत विचवे
रावेर. ९८८१६६९८१२